## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २१३/२०२१

## मध्ये निशाणी क्र.११ वर आदेश

अर्जदार क्र.१ हिने स्वत:साठी कौटुंबिक हिसेंपासून स्त्रियांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२) अर्जदार सामनेवाला क्र.१ हयांचा विवाह रितीरिवाजाप्रमाणे दिनांक ०७/०३/१९९५ रोजी झाला. सदर विवाह संबंधातून अर्जदार व सामनेवाला क्र.१ हयांस ५ मुली व १ मुलगा अशी अपत्ये आहेत. सामनेवाला हयांनी अर्जदार हिचा अतिशय मानसिक, शारिरीक आणि आर्थिक छळ केला आहे.

३) अर्जदार हिला स्वत:चे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिस सामनेवाला हयांनी मानसिक त्रास दिल्याने तिच्या मनाचे खच्चीकरण झाल्याने मानसिकरित्या अस्वस्थ असल्याने व अर्जदार ही अशिक्षित असल्याने कोठेही नोकरी करू शकत नाही. त्यामुळे अर्जदार स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास सक्षम नाही. अर्जदार हिला नाईलाजाने तिच्या भावाच्या घरी रहावे लागत आहे. अर्जदाराच्या भावाची परिस्थिती हालाखीची असुन त्यांच्यावर आई वडीलांची व त्यांची पत्नी व मुलांची जबाबदारी आहे. याउलट सामनेवाला क्र.१ हयांचा कन्स्ट्रक्शनचा व्यवसाय करीत असून स्वत:ची पोखळण आहे. तसेच स्वत:च्या मालकीचे दोन डंपर गाडया असुन त्याचा नं. एम.एच.०६, के.८१४१ आणि एम.एच.०६, ए.सी.९११० असा आहे. सामनेवाला क्र.१ हयास दरमहा दोन ते अडिच लाख रूपये उत्पन्न आहे.

४) तसेच सामनेवाला क्र.१ हयांचे दुर्गादेवी कन्स्ट्रक्शन नावाने १५ कोटी व्यवसायाचे लायसन्स आहे. सामनेवाला क्र.१ हयांच्या नावे मौजे तळेगाववाडी

येथे ११ गुंठे जमीन आहे. सामनेवाला क्र.१ हयांची गावी भरपूर शेती असुन ७ एकर जागा त्यांच्या नावे आहे. तसेच मौजे खानावळे येथे १२ गुंठे जमीन आहे.

५) तसेच सामनेवाला क्र.१ हयांच्या मुळ अर्जात नमुद केलेल्या पत्त्यावर सर्व सुखसोयींनी युक्त असे प्रशस्त घर आहे. तसेच त्याशेजारीच अर्जदार व सामनेवाला क्र.१ हयापूर्वी राहत असलेले जूने घर आहे. सामनेवाला क्र.१ हा मुलांसह नवीन घरात राहत असून जुने घर रिकामेच आहे. अर्जदार हिस राहण्याची व्यवस्था नाही. सामनेवाला हयांचे जुने घर हे रिकामे असल्याने अर्जदार हिस सदर घरामध्ये तूर्त राहण्याची व्यवस्था होणे आवश्यक झालेले आहे.

६) सदर चौकशी अर्जाचे कामकाज चालण्यास बराच विलंब लागणार आहे. तसेच अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नसल्याने पालनपोषनाचा, औषधपाण्याचा, राहण्याचा खर्च करणे अशक्य झाले आहे. तसेच अर्जदार हिच्या भावाचे घर भाडेतत्वाचे असल्याने व त्याचा स्वत:चे कुटूंब मोठे असल्याने अर्जदार हीस तेथे राहणे अवघड झाले आहे. त्यामुळे अर्जदार हिस तिच्या उदरनिर्वाहाकरीता आवश्यक ती रक्कम सामनेवाला हयाचेकडून मिळणे अत्यावश्यक झालेले आहे. तसेच सामनेवाला हयांच्या दुसऱ्या घरामध्ये तिच्या राहण्याची सोय करण्याकरिता अर्जदाराने सदरचा अर्ज केला आहे.

**<u>सामनेवाला हयांचे म्हणणे :—</u>**

७) सामनेवाला हयांनी निशाणी क्र.१४ वर आपले म्हणणे सादर केले. त्यात त्यांनी सामनेवाला क्र.१ हयाचे अर्जदार हिच्याशी विवाह झाल्याचे मान्य केले आहे व अर्जदाराचे सर्व आरोप फेटाळले आहेत.

८) अर्जदार हयानी खोटा, खोडयाळ व बनावट कथनांचा आधार घेऊन सदरहू अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब सदर अर्जातील कथने व मजकूर हा सामनेवाला हयांना मान्य व कबुल नाही. सदर अर्जातील कथनांना पूराव्यांचा व वस्तूस्थितीचा आधार नसल्याकारणाने सदरहू अंतरिम पोटगीचा अर्ज हा खर्चासह फेटाळण्यास पात्र आहे.

९) अर्जदार हया स्वत:हून राजीखुषीने, अक्लहुशारीने स्वत:च्या कायदेशीर जबाबदाऱ्या झुगारून माहेरी गेलेल्या आहेत. तसेच त्यांना टेलरींग व्यवसायातून चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळते. अर्जदार हयांनी केलेले आरोप हे खोटे, खोडसाळ व बनावट प्रकारातील आहे. सामनेवाला हयांनी कधीही कौटुंबिक हिसाचार केलेला नाही. सबब सदरहू कलमा अर्तगत पोटगी मागण्याचे अर्जदार हयांनी कोणतेही हक्क अधिकार नाहीत. तथा अर्जदार हयांनी केलेली मागणी ही अत्यंत बेकायदेशीर आहे. सामनेवाला हयांचे दरमहा उत्पन्न हे अत्यल्प असल्याने अवाढव्य अशी मागणी पूर्ण होऊ शकत नाही. तसेच बेकायदेशीर प्रकारातील अंतरीम पोटीगी मागणेकरीतेचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विंनती केली आहे.

१०) उभयतांच्या कथनांचा व कौटुंबिक हिसांचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे तरतुदींचा विचार करता माझ्यापुढे खालील वादप्रश्न उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष त्यापुढे नोंदविण्यात येत आहेत—

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार हिचा दैनंदिन खाण्यापिण्याचा खर्च, औषधपाणी, कपडालत्ता इत्यादिकरिता दरमहा रुपये ३०,०००/— इतकी अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे का ? | अंशत: होय<br>दरमहा रक्कम रुपये २,५००/— मिळण्यास पात्र |

| | | |
|---|---|---|
| २) | सामनेवाला हयांनी अर्जदार हिस राहत्या घ रापासून वंचित ठेवल्याने सामनेवाला व अर्जदार हे पुर्वी राहत असलेले जुने घर जे रिकामे आहे. त्या घरामध्ये अर्जदार हिला राहण्याचा आदेश मिळण्यास अर्जदार पात्र आहे का? | नाही |
| ३) | अर्जदार हीस भाडयापोटी दरमहा रक्कम रू. ५,०००/— व आवश्यक ती अनामत रक्कम रू.३०,०००/— मिळण्याच्या आदेशास पात्र आहे का ? | नाही. |
| ४) | अर्जदार अर्जाचा खर्च मिळण्यास पात्र आहे का? | नाही. |
| ५) | सामनेवाला हयांनी स्वत: अगर त्यांचे नातेवाईकांमार्फत, त्रयस्थांमार्फत अर्जदार हिचा कुठल्याही प्रकारचा शारिरीक व मानसिक छळ करू नये, असा आदेश मिळण्यास अर्जदार पात्र आहे का? | होय. |
| ६) | आदेश काय? | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्रमांक १ करिता :—**

११) अर्जदार हयांचे विधीज्ञ हयांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवाला क्र.१ हयाने अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केलेला असून त्या स्वत:ची उपजिवीका करण्यास असमर्थ असल्याने अर्ज मंजूर करण्याचा युक्तीवाद तिचे वकीलांनी केला. तसेच सामनेवाला हयांचे विधीज्ञ हयांचा युक्तीवाद ऐकला.

१२) प्रस्तूत प्रकरणात सामनेवाला क्र.१ हयानी निशाणी क्र.१४ वर आपले म्हणणे सादर केलेले आहे. त्यामुळे केवळ अर्जदार ही स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे किंवा नाही तसेच सामनेवाला हयाच्याकडे अर्जदाराचे पालन पोषण

करण्यासाठी उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे किंवा नाही हेच पाहणे गरजेचे आहे. कोणत्याही स्त्रीचे लग्न झाल्यानंतर तिच्या निर्वाह भत्त्याची सर्वस्वी जबाबदारी तिच्या पतीवर असते. लग्नानंतर लगेचच पत्नीला निर्वाह भत्त्याचा अधिकार प्राप्त होतो. पत्नीचे पालनपोषण करणे, ही पतीची नैतीक जबाबदारी असते.

१३) सामनेवाला क्र.१ हयांनी विस्तृत म्हणणे दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्याकरिता प्रकरणाच्या अगदी खोलात जाणे आवश्यक नाही. केवळ अर्जदार व सामनेवाला क्र.१ हयांचा विवाह व अर्जदार हिस सामनेवाला क्र. १ हा उदरनिर्वाहसाठी पैसे देत नाही या गोष्टी अभिलेखावर येणे आवश्यक आहेत.

१४) कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या कायद्यातील कलम २३ नुसार अंतरिम आदेशाकरीता केलेल्या अर्जाचा निकाल देतांना प्रकरणात खोलवर जाणे आवश्यक नसते. केवळ प्रथमदर्शनी तथ्ये दिसून येणे आवश्यक असते. पिडीत स्त्रीला तिने अर्जात केलेल्या कथनांना तसेच सामनेवालाने त्याचे उत्तरात केलेल्या कथनांना दुजोरा देण्यासाठी पुरावा दाखल करणे आवश्यक नसते.

१५) प्रस्तूत प्रकरणात सामनेवाला क्र.१ हयाने अर्जदार हिचेशी झालेला विवाह मान्य केलेला आहे. तसेच अर्जदार ही तिचे माहेरी राहत असल्याचे देखील अभिलेखावर आले आहे. अर्जदार ही नोकरी करीत असून तिचा चरितार्थ चालविणेसाठी सक्षम आहे हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा सामनेवाला हयांनी अभिलेखावर आणलेला नाही. याउलट सामनेवाला क्र.१ हयास दरमहा रक्कम रूपये १२,०००/— पेक्षा कमी उत्पन्न असल्याची बाब देखील सामनेवाला क्र.१ हयांनी अभिलेखावर आणलेली नाही. अर्जदार स्वत:चा उदर निर्वाह करण्यासाठी असक्षम असल्याचे दिसून येते. म्हणून अर्जदार ही सामनेवाला हयाचेकडून पोटगीची रक्कम मिळण्यास पात्र असल्याचे निष्पन्न होते.

१६) सामनेवाला क्र.१ हयाचे दुर्गादेवी कन्स्ट्रक्शन नावाने १५ कोटी व्यवसायाचे लायसन्स असल्याचे अर्जदाराचे म्हणणे असले तरी त्याबाबतचे कोणतेही दस्तऐवज अभिलेखावर आलेले नाहीत, त्यामुळे अर्जदाराची रक्कम रुपये ३०,०००/— इतकी अंतरिम पोटगी मिळण्याची मागणी अवास्तव वाटत आहे. अर्जदार व सामनेवाला हयांचे राहणीमान व जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती पाहता अर्जदाराला अंतरिम निर्वाह भत्यापोटी दरमहा रक्कम रुपये २,५००/— देणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादप्रश्न १ चे उत्तर मी त्याप्रमाणे नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्रमांक २ ते ४ करिता</u> :—**

१७) अर्जदाराने अर्ज करण्यात आलेल्या खर्चा संदर्भात कोणतेही कथन केलेले नाही. निवासासाठी मासिक भाडे रू.५,०००/— अनामत रक्कम रू. ३०,०००/— मिळण्याची विनंती केली आहे. परंतु त्याबाबत अर्जदाराने राहणार असलेल्या घराचा तपशील, मासिक भाडे पावती किंवा इतर पुरावे दाखल केलेले नाही. तसेच सामनेवाला क्र.१ हयांचे जुने घरासंदर्भात कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे वादप्रश्न ३ व ५ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्रमांक ५ करिता</u> :—**

१८) अर्जदार हिला मानसिक व शारिरीक त्रास देण्यापासून परावृत्त करण्यासाठी सामनेवाला हयांचेविरूध्द मनाई हुकूम देण्याची मागणी अर्जदार हिने केलेली आहे. कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत असलेल्या महिलांच्या हक्कांचे परिणामकारक संरक्षण करण्याचा, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ या कायदयाचा प्रमुख उद्‌देश आहे. त्यामुळे अर्जदार हिचे संरक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून वादप्रश्न ५ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्रमांक ६ करिता :—</u>**

१९) उभय पक्ष एकमेकांपासून विभक्त राहत असल्याबाबत कोणतेही दुमत नाही. अर्जदार ही सामनेवाले पासून विभक्त असल्यापासून तिच्या उपजिविकेकरीता कोणतीही तरतूद केली नसल्याचे स्पष्ट होते. अशा परिस्थितीत अर्जदार ही स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब हया टप्प्यावर अर्जदाराचे उपजिविकेकरीता अंतरिम पोटगी अर्ज मंजूर करणे न्यायोचित आहे. अर्ज मंजूर केल्यास सामनेवाला हयांच्या हक्कावर कोणतीही बाधा येणार नाही. वादप्रश्न १ ते ५ च्या निष्कर्षांचे अवलोकन केले असता, अर्जदाराचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत असून वादप्रश्न ६ चा निष्कर्ष नोंदवितांना मी खालील आदेश पारित करीत येत आहे —

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १) | अर्जदाराचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे |
| २) | सामनेवाला क्र.१ हयाने अर्जदार सौ. मंगल यल्लपा देवकर हिस निशाणी क्र.११ चा अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून दरमहा रक्कम रूपये २,५००/— (रूपये दोन हजार पाचशे मात्र) अंतरिम पोटगी म्हणून दयावेत. |
| ३) | सामनेवाला हयांनी स्वत: किंवा इतरांमार्फत अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार करू नये, त्यांना कोणताही शारिरिक किंवा मानसिक त्रास देऊ नये, अशाप्रकारचा मनाई हुकूम जारी करण्यात येत आहे. |
| ४) | सदर आदेशाची प्रत, संरक्षण अधिकारी, तसेच संबधित पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी हयांना पाठविण्यात यावी. |
| ५) | अर्जदार व सामनेवाला हयास निकालाची प्रत मोफत देणेत यावी. |

Digitally signed by LATA KIRAN SAPKAL
Location: Khalapur, Dist Raigad
Date: 2023.02.14 18:19:45 +0530

( ल. कि. सपकाळ )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट क्र.३, खालापूर.

ठिकाण :— खालापूर.
दिनांक :— १३/०२/२०२३.